लेखी परिक्षा उत्तरपत्रिकेसंदर्भात सर्वसाधारण माहिती खालील प्रमाणे आहे.

1. उत्तरपत्रिकेतील माहिती भरण्यासाठी व वर्तुळ छायांकीत करण्याकरिता काळया शाईचे बॉल पॉईंट पेन वापरावे.
2. ज्या प्रश्नाचे उत्तर नमुद करावयाचे आहे त्या प्रश्न क्रमांकासमोर दिलेल्या 4 वर्तुळा पैकी फक्त एक अचुक वर्तुळच छायांकीत करावे.
3. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नमुद करण्याकरीता प्रत्येकी एकच वर्तुळ छायांकीत करावे. एका पेक्षा अधिक वर्तुळे छायांकीत केल्यास अशा उत्तरास गुण दिले जाणार नाहीत. पुर्ण वर्तुळ छायांकीत करावे. वर्तुळाचे बाहेर छायांकित केल्यास गुण दिले जाणार नाहीत.
4. उत्तरपत्रिका काळजीपुर्वक हाताळावी ती हाताळताना वा उत्तरे लिहताना चुरगाळु नये, फाडु नये अथवा टाचणी किंवा टॅग ने छिद्र पाडु नये. तसेच सदर उत्तरपत्रिका पाण्याने , घामाने अथवा धुळीने खराब होणार नाही याची सर्वोतोपरी दक्षता घ्यावी.
5. कच्चे काम प्रश्नपुस्तीकेत विहीत केलेल्या जागीच करावे ते उत्तरपत्रिकेवर अथवा अन्य ठिकाणी करु नये.
6. एकदा नमुद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमुद केलेले उत्तर खोडुन नव्याने उत्तर नमुद केल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केल्यास गुण दिले जातील.
7. वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकान करताना उत्तरपत्रिकेत नमुद केलेल्या योग्य उत्तरानांच गुण दिले जातील.
8. प्रस्तुत उत्तरपत्रिका कार्बन लेस ओ.एम.आर. शिट या प्रकारातील असुन परिक्षेचा कालावधी संपेपर्यंत उत्तरपत्रिकेचा भाग दोन मुळ उत्तरपत्रिकेपासुन कोणत्याही परिस्थितीत वेगळा करु नये.
9. परिक्षा कालावधी संपल्यानंतर उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे जमा करण्यापुर्वी उत्तरपत्रिकेचा भाग दोन मुळ उत्तरपत्रिकेपासुन विहीत केलेल्या

Scanned by CamScanner

ठिकाणी व्यवस्थीतपणे फाडुन वेगळा करावा.परिक्षेनंतर उत्तरपत्रिकेचा भाग दोन सोबत घेऊन जाण्याची परवानगी देण्यात येईल व प्रत मिळाले बाबत स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.

10. मुळ उत्तरपत्रिकेपासुन भाग-2 वेगळा करताना मुळ उत्तर पत्रिका फाटणार नाही अथवा चुरगळणार नाही याची दक्षता घ्यावी.

11. उत्तरपत्रिकेमध्ये अचुक चेस्ट क्रमांक लिहुन उमेदवारानी स्वाक्षरी करावी. कोणीही उमेदवार स्वतःचे नांव उत्तरपत्रिकेवर लिहणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

12. उमेदवाराने कॉपी केल्यास किंवा इतर आक्षेंपार्ह मजकुन व इलेक्टॉनिक साधने सोबत आणल्यास त्यांना लेखी परिक्षेत अपात्र करण्यात येईल.

13. उमेदवारांनी पोलीस भरती संबंधी कोणत्याही पोलीस अधिकारी,कर्मचारी व इतर कोणाकडुनही दबाव आणल्यास तसे आढळुन आल्यास त्यांची उमेदवारी रद्य करुन कायदेशिर कार्यवाही केली जाईल. तसेच उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या भुलथापांना बळी पडु नये.

Scanned by CamScanner